भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ८४६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/१२/२०१६

**१) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु तर एक जखमी . :–**

दिनांक २५/१२/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील जखमी अनीरुध्द फत्तुजी देशमुख वय २५ वर्ष, रा. उमरेड जि. नागपुर हा मोटार सायकल क्र. एमएच ४० एयु ८६४५ ने निहाल मिताराम नारनवरे सोबत भंडारा कडुन लाखनी जात असतांना मागेहुन येणाऱ्या यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपने चालवुन धडक देवुन मोटार सायकल सह दोघेही रोडवर पडल्याने दोघांच्या ही डाव्या पायाला मार लागल्याने उपचारासाठी सा. रु. भंडारा येथे भरती करण्यात आले होते यातील मृतक निहाल निताराम नारनवरे वय २५ वर्ष, रा. तुमसर यास पुढील उपचार करण्यासाठी होप दवाखाना नागपुर येथे उपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान दि. २६/१२/२०१६ चे १३.३० वा मरण पावल्याने पोस्टे पाचपावली नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र सरतर्फे फिर्यादी पोना. टेंभुने यांनी पोस्टे कारधा येथे आणुन पेश केल्याने पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. काळे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२)मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी चालकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २६/१२/२०१६ चे ०९.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन जखमी महेंद्र सावजी मेश्राम वय ५० वर्ष, रा. बारवा हा पायदळ जात असता त्यास धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सुमीत महेंद्र मेश्राम वय २० वर्ष, रा. बारवा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाने पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**३) रेस्ट्रारेंट बार मध्ये जिवनावश्यक वस्तु मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २७/१२/२०१६ रोजी १५.३० वा. दर. यातील आरोपीने आपल्या शारदा रेस्ट्रारेंट बार मध्ये स्वयंपाक खोलीत घरघुती वापरण्याचा गॅस लाल रंगाचा सिलेंडर सीरीयल नं. ६७६१७८ पी १४.२ किलो असे अंकात लिहीला असलेला अंदाजे कि. २,०००/–रु. चा गॅस भरलेला अर्धवट व एक गॅस रेग्युलेटर unreducps pressurs असे लिहीलेला पॉईटसह कि. २५०/–रु. असा एकुण २२,५०/–रु. चा माल मिळुन आल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३,७ जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. शेटे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) कोरडया विहीरीत पडुन वृध्दाचा मृत्यु. :–**

दिनांक २६/१२/२०१६ चे १९.०० वा. दर. ते २७/१२/२०१६ चे ०७.०० वा. दर. यातील मृतक सहादेव रामा भोयर वय ८० वर्ष, रा. खापरी हा नरेश रेहपाडे यांचे शेतावर जागली करीता गेला असता कोरडया विहीरीत पडल्याने त्याचे छातीला व पायाला मार लागुन मरण पावल्याने फिर्यादी मोहन सहादेव भोयर वय ३५ वर्ष, रा. खापरी/रेहपाडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.